**ठळक बातम्या**

- आसाममध्ये १८ हजार ५३० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

- देशभरात आज हिंदी दिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

- जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या जस्मिन लँबोरियानं पटकावलं सुवर्ण पदक

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तानमध्ये सामना होणार

**<><><><>**

भारत जगातला सर्वात वेगानं विकसित होणारा देश असून त्याचप्रमाणे आसाम देखील देशातल्या सर्वात जलद वाढ नोंदवणाऱ्या राज्यांपैकी एक आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज आसाममध्ये दरांग इथं १८ हजार ५३० कोटी रुपयांच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन झालं, त्यावेळी ते बोलत होते. आसामचा विकास जलदगतीनं करण्याचा डबल इंजिन सरकारचा निर्धार आहे, संपूर्ण देश आज विकसित भारताच्या निर्मितीसाठी एकजुटीनं कार्य करत असून त्यात मुख्यत्वे युवावर्गाचं योगदान बहुमोल आहे, असं त्यांनी सांगितलं. ईशान्य भारताच्या विकासावर आपला भर असल्याचं मोदी म्हणाले…

**- - होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - -**

एकविसाव्या शतकातली पहिली २५ वर्ष सरली आहेत आणि यापुढील वर्ष ईशान्य भारताची असतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोणत्याही भागाच्या विकासासाठी संपर्कव्यवस्था उत्तम असणं गरजेचं असून केंद्र सरकार देशभरात कनेक्टिव्हिटी वाढवण्यावर भर देत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><>**

देशभरात आज हिंदी दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे. १९४९ मध्ये आजच्याच दिवशी संविधान सभेनं देवनागरी लिपीतली हिंदी, देशाची राजभाषा म्हणून

स्वीकारली होती. आज हिंदी ही जगातल्या सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी एक आहे. तब्बल ५२ कोटींहून अधिक लोकांची ती पहिली भाषा आहे.

हिंदी दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. हिंदी हे केवळ संवादाचं  माध्यम नाही तर आपली ओळख आणि मूल्यांचा जिवंत वारसा आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. जागतिक पटलावर हिंदीला मिळणारा वाढता आदर ही देशासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी गोष्ट आहे असं सांगून  हिंदीसह सर्व भारतीय भाषा समृद्ध करण्याचा आणि त्या  भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करूया, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

तर हिंदी भाषा देशातल्या विविध भाषा आणि बोलींमध्ये सेतूचं काम करते, असं अमित शहा यांनी म्हटलं आहे. शहा यांच्या हस्ते आज गुजरातमधल्या गांधीनगर इथं पाचव्या अखिल भारतीय राजभाषा परिषदेचं उद्घाटन झालं. मुलांच्या जडणघडणीत मातृभाषेचं महत्त्व लक्षात घेऊन पालकांनी आपल्या मुलांना मातृभाषा शिकवावी, मुलांशी मातृभाषेतच संवाद साधावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत केंद्र सरकारने आरोग्य क्षेत्राशी संबंधित केलेल्या अनेक सुधारणांमुळे औषधं, वैद्यकीय उपकरणं आणि उपचार अधिक स्वस्त होणार आहेत. या सुधारणांनुसार, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या ३६ जीवरक्षक औषधांवरचा वस्तू आणि सेवा कर शून्य केला असल्यानं उपचारांवरच्या खर्चात मोठी बचत होईल.

या व्यतिरिक्त, गॉझ, बँडेज, रोगनिदान चाचणी संच ग्लुकोमीटर आणि थर्मामीटर यांसारख्या विविध वैद्यकीय उत्पादनांवरील जीएसटीही १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला असल्यानं, नागरिकांना महागड्या उपचारांसाठी आर्थिक तडजोड करावी लागणार नाही. यामुळे वेळेवर आणि योग्य उपचार मिळतील, आणि पर्यायानं नागरिकांचं आरोग्य अधिक सुरक्षित होईल. आरोग्य विमा आणि जीवन विम्याच्या प्रीमियमवरही आता शून्य जीएसटी लागू झाल्यानं प्रीमियमची रक्कमही लक्षणीयरीत्या कमी होईल, त्यामुळे अधिकाधिक लोक विमा संरक्षण घेण्याकडे वळू लागतील.

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत आरोग्य क्षेत्रासंबंधीच्या या सुधारणा विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मोठा दिलासा देणाऱ्या असून यामुळे आरोग्यविषयक खर्चात मोठी बचत तर होईलच आणि त्याचवेळी आरोग्यसंपन्न भारताची वाटचालही अधिक दृढ होईल अशीच अपेक्षा आहे.

<><><><>

आंध्र प्रदेशात तिरुपती इथं आजपासून संसद आणि राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या विधानमंडळांमधल्या महिला सक्षमीकरण समितीच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला सुरुवात होणार आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होईल. तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात महिलांमधली नेतृत्व क्षमता वाढवण्याच्या अनुषंगानं सक्षमीकरण करण्यावर या परिषदेत चर्चा होईल. या दोन दिवसीय परिषदेत राज्यसभेचे उपसभापती, आंध्र प्रदेश विधान परिषदेचे सभापती तसंच आंध्र प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष, संसद आणि राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या विधानमंडळांमधील महिला सक्षमीकरण समित्यांचे अध्यक्ष आणि इतर मान्यवरांसह देशभरातून १००पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यानिमित्तानं ओम बिर्ला यांच्या हस्ते एका स्मरणिकेचं प्रकाशनही केलं जाणार आहे. या परिषदेच्या निमित्तानं एका प्रदर्शनाचंही आयोजन केलं जाणार आहे.

<><><><>

महिलांचं आरोग्य आणि निरामयतेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत सुरु केलेल्या ‘स्वस्थ नारी सशक्त परिवार’ या मोहिमेत आयुष मंत्रालय सक्रिय सहभाग घेत आहे. या मोहिमेत कर्करोग, अशक्तपणा, क्षयरोग आणि सिकलसेल यांसारख्या असंसर्गजन्य आजारांसाठी आरोग्य तपासणी आणि तपासणी शिबिरं आयोजित केली जातील. तसंच, जीवनशैलीबाबत समुपदेशन, योग सत्र आणि प्रकृती परीक्षणाद्वारे महिलांचं आरोग्य आणि सक्षमीकरण यावर भर दिला जाईल. महिलांसाठी गरोदरपणापासून ते विशेष वैद्यकीय सेवांबाबत सर्वांगीण आरोग्यसेवा सुनिश्चित केल्या जाणार आहेत.

<><><><>

ब्रिटनमध्ये लिव्हरपूल इथं झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या जस्मिन लँबोरियानं सुवर्ण पदक जिंकून इतिहास रचला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची पदक

विजेती असलेल्या जस्मिननं महिलांच्या ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत पोलंडच्या जूलिया सेरेमेटाला ४-१नं पराभूत केलं. भारताच्या महिला खेळाडूंनी या स्पर्धेत उत्तम कामगिरी करत एकूण तीन पदकं जिंकली. ८० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत भारताच्या नुपूर श्योराणला पोलंडच्या अगाता काझ्मार्स्कानं ३-२ असा पराभूत केलं त्यामुळे तिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं, तर पूजा राणीनं कांस्य पदक पटकावलं. मात्र, पुरुष खेळाडूंना एकही पदक जिंकता आलं नाही.

<><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई इथं आज भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये सामना होणार आहे. रात्री आठ वाजता खेळाला सुरुवात होईल. गेल्या फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत.

दरम्यान, काल रात्री अबुधाबी इथं झालेल्या ब गटाच्या सामन्यात श्रीलंकेनं बांगलादेशावर सहा गडी राखून विजय मिळवला.

<><><><>

आशिया चषक महिला हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज हांगझोऊ येथे भारताचा सामना चीनशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडे पाच वाजता सुरू होईल. या अंतिम सामन्याचा विजेता संघ पुढील वर्षी बेल्जियम आणि नेदरलँड्स येथे होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्र ठरेल.

<><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये, रियासी जिल्ह्यात वैष्णोदेवी यात्रा संततधार पावसामुळे पुढे ढकलण्यात आली आहे. वैष्णोदेवी मंदिर व्यवस्थापनाने काल समाज माध्यमाद्वारे ही घोषणा केली आहे. गेल्या महिन्यात २६ तारखेला झालेल्या मुसळधार पावसामुळे मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर दरडी कोसळल्यानं ही यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली होती.

दरम्यान, पावसाचा जोर काहीसा ओसरल्यामुळे आजपासून या यात्रेला पुन्हा सुरुवात होणार होती. मात्र, आता ही यात्रा पुढे ढकलण्यात आली आहे.

<><><><>

बांगलादेशातल्या लालन गीतांच्या सर्वात लोकप्रिय गायिका फरिदा परवीन यांचं काल रात्री दीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७० वर्षांच्या होत्या. परवीन यांना मूत्रपिंडाचा

आजार होता आणि गेल्या काही आठवड्यांपासून त्यांची प्रकृती अधिक खालावली होती. लालन शाह हे धार्मिक सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक मानले जाते. परवीन या बांगलादेशात लोकसंगीतातील एक महान आवाज आणि क्वीन ऑफ लालन गीती म्हणूनही प्रसिद्ध होत्या.

**<><><><>**

लंडनमध्ये स्थलांतरविरोधात निघालेल्या मोर्चादरम्यान काही आंदोलक आणि पोलिसांमध्ये चकमक झाली. यात २६ अधिकारी जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या मोर्चात एक लाखापेक्षा जास्त जण सहभागी झाले होते. आंदोलक आणि त्यांच्या विरोधात निदर्शने करणाऱ्यांना वेगवेगळी जागा निश्चित केलेली असतानाही, काहींनी घुसखोरी केली आणि अधिकाऱ्यांवर हल्ले केले. या प्रकरणी २५ जणांना अटक केली आहे अशी माहिती पोलीस यंत्रणेनं दिली आहे.

**<><><><>**

नाटो सदस्य देशांनी रशियाकडून इंधन खरेदी करणं थांबवावं असं आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. चीन आणि रशिया यांच्यातल्या संबंधांमुळे अमेरिका चीनवर ५० ते १०० टक्के कर लावेल आणि युक्रेनसोबतचा संघर्ष थांबेपर्यंत हा कर आकारला जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. युक्रेनसंघर्ष थांबावा अशी कळकळीची इच्छा असेल तर नाटो सदस्य देशांनी या आवाहनाला प्रतिसाद द्यावा असं अमेरिकेनं म्हटलं आहे.

**//<><><><>//**